# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
## MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION

**मुख्य कार्यालय**

बँक ऑफ इंडिया इमारत, 3 रा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई 400001 ☎2267 0210 /148 /248,22102222 फॅक्स : 22673915

Bank of India Bldg, 3rd floor, Mahatma Gandhi Road, Hutatma Chowk, Mumbai 400001 ☎ 2267 0210/148/248, 22102222 Fax : 22673915

**माझगांव कार्यालय**

विक्रीकर भवन, 9 वा मजला,रुम नंबर 915, सरदार बलवंतसिंग दोधी मार्ग, माझगांव, मुंबई 400203 ☎23742191 फॅक्स : 23781061

Vikrikar Bhavan, 9th floor, Room No.915, Sardar Balvantsing Dodhi Marg, Mazgaon, Mumbai 400203 ☎23742191 Fax : 23781061

**ई-मेल sec.mpsc@maharashtra.gov.in, mpscpre@gmail.com वेबसाईट – www.mpsc.gov.in, www.mpsconline.gov.in**


**राज्य सेवा (पूर्व) परीक्षा -२०१२**

**क्रमांक १४७७(१)/२०१२/तीन** **जाहिरात क्रमांक : २२७ /२०१२**

निम्नलिखित पदांकरिता राज्य सेवा (पूर्व) परीक्षा-२०१२ ही **रविवार, दिनांक १० जून २०१२** रोजी महाराष्ट्रातील विविध **३५ जिल्हाकेंद्रावर** घेण्यात येईल. प्रस्तुत जाहिरातीत नमूद केलेल्या अटींची पूर्तता करणा-या उमेदवारांकडून **ऑनलाईन** पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. पूर्व परीक्षेत अर्हताप्राप्त ठरणा-या उमेदवारांना मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

२. उपलब्ध पदसंख्या :-

| अ. क्र. | पदाचे नाव व एकूण पदसंख्या | अराखीव | अ.जाती व त्यातील बौध्द धर्मांतरित | अनुसूचित जमाती | वि. जा. (अ) | भ. ज. (ब) | वि. मा प्र. | भ. ज. (क) | भ. ज. (ड) | इ. मा. व |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | उपजिल्हाधिकारी, गट अ (एकूण ४२ पदे) | २३ | ६ | ३ | ३ | -- | -- | -- | ३ | ४ |
| | महिला - | ७ | २ | १ | १ | -- | -- | -- | १ | १ |
| | खेळाडू - | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | अपंग - | @ श्रवण शक्तीतील दोष- १ | | | | | | | | |
| २ | पोलीस उप अधिक्षक/ सहायक पोलीस आयुक्त,गट अ (एकूण ४० पदे) | २३ | २ | ३ | १ | १ | १ | -- | १ | ८ |
| | महिला - | ७ | १ | १ | -- | -- | -- | -- | -- | २ |
| | खेळाडू - | २ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| ३ | सहायक विक्रीकर आयुक्त, गट-अ (एकूण १२६ पदे) | ५४ | १२+६* | ६+१* | ४+१* | ३ | ३ | ३+१* | २ | २१+९* |
| | महिला - | १६ | ६ | २ | १ | १ | १ | १ | १ | ९ |
| | खेळाडू - | ३ | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | १ |
| | अपंग - | @ चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू- २@ श्रवण शक्तीतील दोष -१ | | | | | | | | |
| ४ | उपनिबंधक सहकारी संस्था, गट अ (एकूण ९ पदे) | ५ | १ | १ | -- | -- | -- | -- | -- | २ |
| | महिला - | २ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ |
| | खेळाडू - | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| ५ | उपमुख्य कार्यकारी अधिकारी/गट विकास अधिकारी, गट - अ (उच्च श्रेणी) (एकूण ७पदे) | ४ | १ | १ | -- | -- | -- | -- | -- | १ |
| | महिला - | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | खेळाडू - | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| ६ | महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, गट अ (कनिष्ठ) (एकूण ९ पदे) | २ | १+३* | १+२* | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | महिला - | १ | १ | १ | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | खेळाडू - | -- | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| ७ | मुख्य अधिकारी, नगरपालिका/नगरपरिषद गट अ(एकूण ८ पदे) | ४ | १ | -- | -- | -- | १ | -- | १ | १ |
| | महिला - | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | खेळाडू - | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| ८ | तहसिलदार, गट अ (एकूण ३८ पदे) | २० | ७ | ६ | -- | -- | -- | २ | -- | ३ |
| | महिला - | ६ | २ | २ | -- | -- | -- | १ | -- | १ |
| | खेळाडू - | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | अपंग - | @ अंधत्व किवा क्षीण दृष्टी- १ | | | | | | | | |
| ९ | गट विकास अधिकारी, (नि. श्रेणी) गट - ब (एकूण ३ पदे) | -- | -- | -- | -- | -- | -- | २* | १* | -- |
| | महिला - | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | -- |
| | खेळाडू - | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| १० | मुख्य अधिकारी,नगरपालिका, नगरपरिषद गट ब, (एकूण २९ पदे) | ११ | १ | -- | -- | १+१* | २* | १+२* | १* | ५+४* |
| | महिला - | ३ | -- | -- | -- | १ | १ | १ | -- | ३ |
| | खेळाडू - | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ११ | **सहायक निबंधक सहकारी संस्था, गट ब (एकूण १९ पदे)** | ३ | २+२* | १+५* | २* | १* | -- | -- | -- | ३* |
| | महिला - | १ | १ | २ | १ | -- | -- | -- | -- | -- |
| | खेळाडू - | -- | -- | १ | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | अपंग - | @ श्रवण शक्तीतील दोष- १ | | | | | | | | |
| १२ | **उप अधिक्षक, भूमी अभिलेख,गट-ब (एकूण ६ पदे)** | २ | -- | १* | १* | -- | -- | -- | -- | २ |
| | महिला - | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ |
| | खेळाडू - | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | अपंग - | @ चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू- १ | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| १३ | **उप अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गट ब (एकूण १ पद)** | -- | १* | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| १४ | **सहायक आयुक्त राज्य उत्पादन शुल्क, गट ब (एकूण २ पदे)** | २ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | महिला - | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |

२.१ महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, गट ब, इत्यादी संवर्गाकरिता शासनाकडून पदे उपलब्ध होण्याची शक्यता आहे. सदर पदे उपलब्ध झाल्यास मुख्य परीक्षेच्या अधिसूचनेत त्याबाबतचा तपशील देण्यात येईल.

२.२ * अशी खुण केलेली पदे अनुशेषाची आहेत.

२.३ वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

२.४ महिला व खेळाडूंसाठी आरक्षित असलेली पदे सबंधित वर्गवारीतील भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.

२.५ महिलांसाठी असलेले आरक्षण शासननिर्णय महिला बालविकास विभाग क्र. ८२/२००१/म.से.आ २०००/प्र. क्र. ४१५/का-२ दिनांक २५ मे, २००१ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

२.६ खेळाडूंचे आरक्षण शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

२.७ अपंग उमेदवारांची पात्रता शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील. अपंगासाठी असलेली पदे भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील. बाब क्रमांक २.१ मध्ये नमूद केलेल्या पदांपैकी काही संवर्गात शासनाकडून अपंगासाठी पदे उपलब्ध होण्याची शक्यता आहे.

२.८ अपंग उमेदवारांना गुणवत्तेनुसार लेखनिकाची मदत घेता येईल. **तथापि, त्यांनी तसे आयोगास स्वतंत्ररित्या पत्राने कळविणे आवश्यक आहे**.

**३. वेतनश्रेणी :-**

३.१ गट -अ च्या पदांकरिता रूपये १५,६००-३९,१००, नियमानुसार ग्रेड पे अधिक भत्ते.

३.२ गट-ब च्या पदांकरिता रूपये ९,३००-३४,८००, नियमानुसार ग्रेड पे अधिक भत्ते.

**४. पात्रता :-**

४.१. :-भारतीय नागरीकत्व

४.२ वयोमर्यादा :-

४.२.१ **उपजिल्हाधिकारी, गट अ,** पदाकरिता दिनांक १ एप्रिल, २०१३ रोजी किमान १९ वर्षे असावे व ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे.

४.२.२ उर्वरित पदांसाठी दिनांक १ जुलै, २०१२ रोजी किमान १९ वर्षे असावे व ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे.

४.२.३ उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम :-

(१) महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत ५ वर्षांपर्यंत.

(२) अपंग उमेदवारांच्या बाबतीत ४५ वर्षांपर्यंत.

(३) पात्र खेळाडूंच्या बाबतीत ५ वर्षांपर्यंत.

(४) माजी सैनिक/ आणीबाणी व अल्पसेवा राजादिष्ट अधिकारी यांचेसाठी कमाल वयोमर्यादा ५ वर्षांपर्यंत.

(५) विहित वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथिल केली जाणार नाही.

**४.३ शैक्षणिक अर्हता :-**

४.३.१ मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने मान्य केलेली समतुल्य अर्हता.

४.३.२ पदवी परीक्षेस बसलेले उमेदवार सुध्दा या पूर्व परीक्षेस तात्पुरते पात्र असतील. परंतु राज्य सेवा (मुख्य) परीक्षा- २०१२ करिता अर्हताप्राप्त ठरणा-या उमेदवारांनी राज्य सेवा (मुख्य) परीक्षा २०१२ ची माहिती स्वीकारण्याच्या विहित अंतिम दिनांकापर्यन्त पदवी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. तसेच ज्या पदासाठी अंतर्वासिता किंवा कार्यशाळेतील कामाचा अनुभव आवश्यक असेल त्या पदवीधारकाने ही अट मुख्य परीक्षेची माहिती स्वीकारण्याच्या विहित अंतिम दिनांकापर्यन्त पूर्ण केली असली पाहिजे.

४.३.३. सर्व पदांसाठी मराठीचे ज्ञान आवश्यक राहील.

४.३.४ पोलीस उप अधीक्षक/सहायक पोलीस आयुक्त, गट अ आणि उप अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गट ब या पदावरील नियुक्तीसाठी वर नमूद केलेल्या अर्हतेसोबत उमेदवाराची शारीरिक अर्हता खाली दर्शविल्याप्रमाणे असणे आवश्यक आहेः-

**(एक) पोलीस उप अधीक्षक/सहायक पोलीस आयुक्त, गट अ :-**

| **पुरुष उमेदवारांकरिता** | **महिला उमेदवारांकरिता** |
|---|---|
| उंची - १६५ सें. मी. (अनवाणी) (कमीत कमी)<br>छाती - न फुगविता ८४ से.मी. फुगविण्याची क्षमता - किमान ५ से.मी. आवश्यक. | उंची - १५७ सें.मी. (अनवाणी) (कमीत कमी) |

**(दोन) उपअधीक्षक राज्य उत्पादनशुल्क, गट-ब :-**

| **पुरुष उमेदवारांकरिता** | **महिला उमेदवारांकरिता** |
|---|---|
| उंची - १६५ सें. मी. (अनवाणी) (कमीत कमी)<br>छाती - न फुगविता ७९ से.मी.फुगविण्याची क्षमता- किमान ५ से.मी. आवश्यक | उंची-१५५ सें.मी.<br>(अनवाणी) (कमीत कमी) |

**५.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे.अर्ज करण्याची पद्धत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम, इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील

स्पर्धा परीक्षा अंतर्गत "**उमेदवारांना सर्वसाधारण सूचना** " तसेच " **परीक्षा** " या विभागातील "**राज्य सेवा परीक्षा**" मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन व्हावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

६. उपरोक्त परिच्छेद २ मध्ये नमूद पदांपैकी सहायक आयुक्त राज्य उत्पादन शुल्क गट-ब हे पद वगळता उर्वरित सर्व पदांना शासनाने दि. ८ जून, २०१० रोजी निर्गमित केलेली "महाराष्ट्र शासकीय गट अ व गट ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने नियुक्तीसाठी विभागीय संवर्ग संरचना व विभागीय संवर्ग वाटप याबाबत नियमावली २०१०" लागू असल्याचे शासनाने कळविले आहे.

७. **शुल्क** : ७.१ अमागास - २६०/- ७.२ मागासवर्गीय - १३५/-

८. **अर्ज करण्याची पद्धत** :-

८.१ प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

८.२ पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज www.mpsconline.gov.in या वेबसाईटद्वारे **दिनांक १४ मार्च , २०१२ ते ४ एप्रिल, २०१२** या कालावधीतच सादर करणे आवश्यक राहील.

८.३ ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या www.mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तसेच ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरण्याचे प्रात्यक्षिक (Demo) सदर वेबसाईटवर पाहता येईल.

८.४ विहित पद्धतीने आयोगास अर्ज सादर केल्यानंतर परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

८.५ आयोगाने निश्चित केलेले परीक्षा शुल्क खालील पद्धतीने भरता येईल :-

(१) भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे
(२) क्रेडिट कार्ड
(३) डेबिट कार्ड
(४) नेटबँकिंग
(५) कॅश कार्ड

८.६ भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरल्यावर दोन कार्यालयीन कामकाजाच्या दिवसानंतर (Working Days) उमेदवाराच्या मोबाईल क्रमांकावर आयोगास रक्कम प्राप्त झाल्याबाबतचा एस.एम.एस. आयोगाकडून पाठविण्यात येईल. तसेच उमेदवाराच्या प्रोफाईलमध्ये Application Status द्वारे रक्कम प्राप्त झाल्याबाबत सूचना प्राप्त् होईल.

८.७ विहित पद्धतीने अर्ज सादर करुन परीक्षा शुल्क क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, नेटबँकिंग अथवा कॅश कार्डद्वारे भरल्यानंतर उमेदवारांच्या मोबाईल क्रमांकावर आयोगास रक्कम प्राप्त झाल्याबाबतचा (Payment Received) एस.एम.एस. आयोगाकडून पाठविण्यात येईल. तसेच उमेदवाराच्या प्रोफाईलमध्ये Application Status द्वारे रक्कम प्राप्त झाल्याबाबत सूचना प्राप्त होईल.

८.८ दोन कार्यालयीन कामकाजाच्या दिवसानंतर आयोगाकडून एस.एम.एस. प्राप्त न झाल्यास अथवा प्रोफाईलद्वारे सूचना प्राप्त न झाल्यास ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या Feedback द्वारे Registration ID, Transaction ID व चलनावरील बँकेत रक्कम भरल्याचा दिनांक पाठवावा.

८.९ प्रस्तुत परीक्षेपूर्वी ७ दिवस अगोदर उमेदवारास प्रवेशप्रमाणपत्र त्याच्या प्रोफाईलद्वारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत उमेदवाराने परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

८.१० परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

९. विहित पध्दतीने अर्ज सादर करुन शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याची अथवा क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, नेटबँकिंग अथवा कॅश कार्डद्वारे रक्कम भरण्याची कार्यवाही **दिनांक ४ एप्रिल, २०१२** रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.

**१०.**चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये **दिनांक ७ एप्रिल, २०१२ पर्यंत** बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे.

**११**. राज्य सेवा (पूर्व) तसेच (मुख्य) परीक्षेचा अभ्यासक्रम आयोगाच्या **www.mpsc.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

ठिकाण : मुंबई
दिनांक : १४ मार्च, २०१२.

**दी. प्र. मिरजकर**
उपसचिव,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

**आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.**